# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ५/२०१४ मधील नि.क्र. ३४ वरील आदेश</u>

(CNR NO MHRG14-00057-2014)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतलेली असून असे कथन केले आहे की, प्रतिवादीने विलबांचे योग्य कारण अर्जात नमुद केले नाही तरी सदरचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा कराराची विशिष्ट पुर्तता (स्पेसिफिक परफॉर्मन्स) करुन मिळणेकरीता व तुर्तातुर्तीचे तसेच निरंतचे मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३ चे असे कथन आहे की, समन्स व नोटीस प्रतिवादी यांचे कार्यालयातील आवक कक्षात प्राप्त झाल्यानंतर संबंधित व्यक्तीने ते नजर चुकीने प्रतिवादी क्र. ३ चे प्राधिकृत व्यक्तीचे निदर्शनास आणले नाहीत व त्यामुळे प्रतिवादी हे दाव्याच्या कामी हजर झाले नाहीत. त्यामुळे सदरहू प्रतिवादी कैफियत दाखल करणेस ७ वर्षे ११ महिने इतका विलंब झालेला आहे.

५. सदर प्रतिवादी क्र. ३ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करत असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींना झालेला ७ वर्षे ११ महिन्यांचा विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांची कैफियत विलंबाने दिली असल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादी क्र. ३ यांस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर

केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. ३ यांचा अर्ज रक्कम रु. ५०००/- च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | प्रतिवादी क्र. ३ यांनी खर्चाची रक्कम रु. ५०००/- वादी यांना दयावी. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – २०.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.